दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ●मंगळवार दि.१६ सप्टेंबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ३१ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Tuesday 16 Sep 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 31 ● Pages 4 ● Rate 4 Rs



प्रतिनिधी नेमणे आहे

लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.


## मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे अजित पवारांकडून गिफ्ट

# बीड जिल्ह्यातील रेल्वे प्रकल्पासाठी १५० कोटींची भर

## १७ सप्टेंबरपासून बीड-नगर रेल्वेसेवा होणार सुरू



**बीड (वृत्तसंस्था)**–बीड जिल्ह्याच्या विकासात महत्त्वाकांक्षी ठरणाऱ्या अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ या या नवीन ब्रॉड गेज रेल्वेमार्ग प्रकल्पाला गती देण्यासाठी राज्य सरकारने तब्बल २ हजार ९१ कोटी रुपये उपलब्ध करून दिले आहेत. त्यात आज नव्याने १५० कोटींची भर पडली असून त्याचा निधी आज वितरित करण्यात आला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवारांनी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाची मराठवाड्याला एकप्रकारे भेटच दिली असल्याचे बोलले जात आहे.मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या दिवशी म्हणजे १७ सप्टेंबर रोजी बीड-अहिल्यानगर या टप्प्यावरील रेल्वेसेवेचा शुभारंभ करण्यात येणार आहे. यामुळे गेल्या अनेक वर्षांचे बीडकरांचे स्वप्न पूर्ण होणार आहे. अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ' या प्रकल्पासाठी राज्य शासनाचा एकूण आर्थिक सहभाग ५० टक्के असून, आजवर शासनाने तब्बल २ हजार ९१ कोटी रुपये उपलब्ध करून दिले आहेत. त्यात आता नव्याने १५० कोटींची भर घालण्यात आली आहे. या निधीचा उपयोग २०२५-२६ या आर्थिक वर्षात रेल्वे विभागाला राज्य सरकारचा हिस्सा देण्यासाठी केला जाणार आहे.

अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ हा रेल्वेमार्ग २६१ किमी लांबीचा असून, त्याचा एकूण खर्च ४ हजार ८०५ कोटीचा राज्यशासनाचा वाटा आहे. आजवर शासनाने जवळपास २ हजार ९१ कोटी २३ लाख रुपये उपलब्ध करून दिले आहेत. त्यात आज १५० कोटींची भर घालण्यात आली असून त्याचे वितरण देखील करण्यात आले आहे.उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून पदभार स्वीकारल्यापासून जिल्ह्याच्या पायाभूत सुविधांच्या विकासावर विशेष भर दिला आहे. यामध्ये त्यांनी विमानतळ, रेल्वे आणि रस्ते विकासाला चालना देण्यासाठी विविध स्तरांवर बैठका घेऊन संबंधित विभागांमध्ये प्रभावी समन्वय साधला आहे. त्यांच्या या प्रयत्नांमुळे 'अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ' या महत्त्वाकांक्षी ब्रॉड गेज रेल्वेमार्ग प्रकल्पाला वेग आला आहे.याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून, मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून 'बीड-अहिल्यानगर' या टप्प्यावरील रेल्वेसेवा सुरू होणार आहे. यामुळे बीड जिल्ह्यातील लाखो नागरिकांना दळणवळणाचा एक मोठा आणि महत्त्वाचा पर्याय उपलब्ध होणार असून, जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळणार आहे.

### बीडकरांच्या आयुष्यात नवा विकास प्रवास सुरू होईल

अजित पवार म्हणाले, अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ रेल्वेमार्ग म्हणजे बीड, अहिल्यानगर आणि परळी वैजनाथ भागातील शेतकरी, विद्यार्थी, उद्योजक, व्यापारी आणि सामान्य जनतेसाठी विकासाला नवी गती देणारा प्रकल्प आहे. या मार्गामुळे जिल्ह्यातील गुंतवणूक वाढेल, रोजगारनिर्मिती होईल आणि वाहतूक सुलभ होईल. बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी हा प्रकल्प गतीमान करण्याचा माझा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. बीड जिल्ह्याचा चेहरा बदलणाऱ्या या प्रकल्पामुळे बीडकरांच्या आयुष्यात नवा विकास प्रवास सुरू होईल, असा विश्वास पवारांनी व्यक्त केला आहे.



# बायको गेली माहेरी; म्हणून मेव्हण्याचे हॉटेल पेटविले

## बायको नांदायला पाठवीत नसल्याने मेव्हण्याचे हॉटेल जाळले

**केज । गौतम बचुटे**

बायको नांदायला येत नसल्याने वैतागलेल्या एका नवऱ्याने चक्क आपल्या मेव्हण्याचे हॉटेल पेटविले. यात हॉटेल मधील ७० ते ८० हजार रु. चे सामान जळून नुकसान झाले आहे.

केज तालुक्यातील कदमवाडी नानाभाऊ कदम यांची मुलगी ज्ञानेश्वरी हिचे लग्न आठ वर्षा पूर्वी सोनिजवळा येथील तानाजी रामदास गायकवाड याचे सोबत झालेले आहे. त्या तीन मुले देखील आहेत. तानाजी गायकवाड हा नेहमी त्याची पत्नी ज्ञानेश्वरी हिला मारहाण करीत असल्याने; ज्ञानेश्वर ही तिच्या तिन्ही मुलांसह माहेर कदमवाडी ता. केज येथे तिचा भाऊ आसाराम कदम यांच्याकडे रायला आलेली आहे.




मागील पंधरा दिवसा पूर्वी त्यामुळे तिचा पती तानाजी गायकवाड हा कदमवाडी येथे येऊन जर त्याची बायको ज्ञानेश्वरी हिला त्याच्याकडे नांदायला पाठविले नाही तर; मेव्हणे आसाराम कदम यास जीवे मारण्याची धमकी देत तुमचे नुकसान करीन धमकी देत होता.

दरम्यान दि. १५ सप्टेंबर रोजी तानाजी गायकवाड याने रात्री हॉटेलमध्ये कोणी नसताना त्याचा मेव्हणा आसाराम कदम याचे केज-बीड रोडवर टाकळी शिवारातील गट नंबर १०६ मध्ये असलेले चहापाण्याचे हॉटेल पेटवून दिले. या आगीत हॉटेलचे पत्र्याचे शेडसह हॉटेलमधील डीप फ्रिज, साधे फ्रिज, काउंटर, खुर्च्या, टेबल, पाण्याचे जार व ईतर साहीत्य जळून खाक झाले आहे. या आगीत सुमारे ७० ते ८० हजार रूपयाचे नुकसान झालेले आहे.

आसाराम कदम यांच्या तक्रारी वरून केज पोलिस ठाण्यात तानाजी गायकवाड याच्या विरुद्ध गु. र. नं. ५०३/२०२५ भा. न्या. सं. ३२६(जी), ३५१(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक सुकुमार उर्फ राकेश बनसोडे हे तपास करीत आहेत.तानाजी कदम हा त्याची पत्नी ज्ञानेश्वरी हिस मारहाण करून छळ करीत असल्याने या पूर्वी ज्ञानेश्वरी हिने युसुफ वडगाव पोलिस ठाण्यात त्याच्या विरुद्ध दोन वेळा तक्रार दिलेली आहे.

## मांजराचे सहा दरवाजे सव्वा मीटरने उघडले : २२९८२.७० क्युसेस विसर्ग सुरू



**केज । गौतम बचुटे**

बीड जिल्ह्यात मांजरा धरण पाणलोट क्षेत्रात पडत असलेल्या पावसामुळे व धरण पाणी पातळी नियंत्रित करण्याचे दृष्टीने दि. १५ सप्टेंबर रोजी रात्री ९:३० वाजता गेट क्रमांक १, २, ३, ४, ५ आणि ६ हे सहा वक्र दरवाजे १.२५० मीटर ने उघडले आहेत. यामुळे मांजरा नदीपात्रात २२९८२.६० क्युसेक्स (६५०.८८० क्युमेक्स) इतका विसर्ग सूरू आहे. धरणामध्ये येणारी पाण्याची आवक पाहून विसर्ग वाढवणे किंवा कमी करणे बाबत निर्णय घेण्यात येईल.तरी, नदी काठावरील आणि पुरामुळे बाधित होणाऱ्या गावातील नागरीकांनी खबरदारी घ्यावी. असे आवाहन प्रशासन आणि मांजरा प्रकल्प धनेगावच्या पुरनियंत्रण कक्ष यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# म्हसावद येथे अवैध दारू बाळगणाऱ्या इसमावर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

## ३ लाख २८ हजारांचा दारूसाठा जप्त!

**नंदुरबार । दिपक गोसावी**

म्हसावद परिसरात स्थानिक गुन्हे शाखेने केलेल्या एका मोठ्या कारवाईत, तब्बल ३ लाख २८ हजार ४४० रुपये किमतीचा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, म्हसावद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नागझिरी गावात शिवा भिल यांच्या शेताजवळ रतिलाल उर्फ रडत्या आलम भिल नावाच्या व्यक्तीने विनापरवाना बिअर आणि विदेशी दारूचा साठा लपवून ठेवला आहे.

ही माहिती मिळताच पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांनी तात्काळ एक पथक तयार केले. या पथकाने म्हसावद



पोलिसांच्या मदतीने सापळा रचून नमूद ठिकाणी छापा टाकला. पोलिसांना पाहताच आरोपी रतिलाल भिलने पळून जाण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी त्याच्या जागेवरून अवैध दारूचा मोठा साठा जप्त केला.

या कारवाईत पोलिसांनी एकूण ३ लाख २८ हजार ४४० रुपयांचा दारूसाठा हस्तगत केला. आरोपी रतिलाल उर्फ रडत्या आलम भिल विरोधात म्हसावद पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (ई) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस, अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी पार पाडली.

# इंडियन मेडिकल असोसिएशनचे माजी राज्याध्यक्ष डॉ.रामकृष्ण लोंढे यांचे निधन

## डॉ.लोंढे यांचे तत्व आणि विचारांचा वारसा जोपासणार-डॉ.राजेश इंगोले यांचे भावोद्गार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

इंडियन मेडिकल असोसिएशनचे माजी राज्याध्यक्ष तथा कळंब येथील सुप्रसिद्ध बालरोग तज्ज्ञ डॉ.रामकृष्ण लोंढे यांचे काल रेल्वे मध्ये प्रवासादरम्यान हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले आहे. डॉ.रामकृष्ण लोंढे यांच्या दुःखद निधनाने कळंब परिसरासह संपूर्ण वैद्यकीय क्षेत्रामध्ये हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.



डॉ.लोंढे यांचे सातत्यपूर्ण कार्य, वैद्यकीय क्षेत्रातील इंडियन मेडिकल असोसिएशन मार्फत डॉक्टरांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी घेतलेला पुढाकार हा वाखाणण्यासारखा होता. तसेच इंडियन मेडिकल असोसिएशन या संघटनेला ग्रामीण भागात रूजविण्याचे काम डॉ.लोंढे यांनी समर्थपणे केले. डॉ.रामकृष्ण लोंढे यांच्या अकाली जाण्याने एक ज्येष्ठ मार्गदर्शक गमावला अशी भावना अध्यक्ष डॉ श.संतोष कदम यांनी व्यक्त केली. तर डॉ.लोंढे यांचे इंडियन मेडिकल असोसिएशनच्या क्षेत्रातील कार्य हे सुवर्णाक्षरांनी नोंद ठेवण्यासारखे आहे असे मत नुतन अध्यक्ष डॉ.संतोष कुलकर्णी यांनी व्यक्त केले. डॉ.रामकृष्ण लोंढे यांच्या जाण्याने इंडियन मेडिकल असोसिएशन मध्ये पोकळी निर्माण झाली आहे. ती भरून निघणे हे येणाऱ्या काळात ही शक्य नसल्याचे मत भावी अध्यक्ष डॉ.मंजुषा गिरी यांनी व्यक्त केले. इंडियन मेडिकल असोसिएशनला ग्रामीण भागात तळागाळात रूजविण्याचे काम वाढविण्याचे काम डॉ.लोंढे यांनी प्रामाणिकपणे केले. त्याचीच परिणीती म्हणून मराठवाड्यामध्ये इंडियन मेडिकल असोसिएशनचा नांवलौकिक झाला तसेच मराठवाड्यातून अनेक तरूण नेतृत्व उदयास आले. त्यांचे अलौकिक कार्य इंडियन मेडिकल असोसिएशनच्या इतिहासामध्ये मैलाचा दगड ठरेल तसेच त्यांच्या तत्व आणि विचारांचा वारसा जोपासण्याचे काम तरूण नेतृत्व करेल असे भावोद्गार इंडियन मेडिकल असोसिएशनचे सांस्कृतिक समितीचे राज्य अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी केले. डॉ.लोंढे यांच्या अंत्यविधीसाठी इंडियन मेडिकल असोसिएशनच्या विविध भागातील पदाधिकारी प्रचंड संख्येने उपस्थित होते. डॉ.रामकृष्ण लोंढे यांचा अंत्यविधी कळंब येथे शोकाकूल वातावरणात करण्यात आला.

संपादकीय

# विद्युत वाहनांस प्रोत्साहन

मुंबईतील सूक्ष्मकण प्रदूषण (पीएम २.५ आणि पीएम १०) हा वायू प्रदूषणाचा मुख्य घटक आहे, जो सार्वजनिक आरोग्यासाठी गंभीर धोका निर्माण करतो. या श्वेतपत्रिकेत मुंबईतील सूक्ष्मकण प्रदूषणाचे स्त्रोत तपासले आहेत, ज्यात वाहतूक क्षेत्राचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. वाहतूक, उद्योग, रस्त्यांवरील धूळ, ऊर्जा उत्पादन आणि निवासी क्षेत्रातून पीएम २.५ व पीएम १० उत्सर्जित होतात. या उत्सर्जनातील घटक आणि ईव्हीचे (इलेक्ट्रिक वाहन) रूपांतर केल्याने प्रदूषण कमी होण्याची शक्यता असून, आरोग्य आणि आर्थिक लाभ देखील प्राप्त होऊ शकतात.मुंबई शहरातील वाढते प्रदूषण आटोक्यात आणण्यासाठी व शहरात विद्युत वाहनांचा वापर वेगाने वाढावा, याला चालना देण्यासाठी सरकारतर्फे जोमाने प्रयत्न सुरू आहेत. यासाठी पालिकेने एक समर्पित इलेक्ट्रिक वाहन सेल सुरू केले होते. शहरात चार्जिंग स्टेशनची संख्या वाढवण्यासाठी प्रयत्न केले गेले आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या विद्युतीकरणावरही भर दिला गेला. परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध होणारी नवीन मॉडेल्स आणि वाढत्या जागरूकता यामुळे इव्हीच्या विक्रीला गती मिळत असली तरी सार्वजनिक वाहने इव्ही होणे वेगळे व खासगी वाहने इव्ही घेणे यात खूपच फरक आहे. आजही त्याला खूप मर्यादा येत आहेत. महाराष्ट्र सरकारने २०२० मध्ये सुधारित इव्ही धोरण आणले आहे. ज्यानुसार २०२८ पर्यंत मुंबई–पुणे नाशिकसारख्या शहरी भागांमध्ये सार्वजनिक वाहतूक व्यवस्था पूर्णपणे विद्युत करण्याचे उद्दिष्ट आहे, मात्र या सेवांना सरकारचे आर्थिक पाठबळ तरी आहे, मात्र छोट्या सार्वजनिक सेवांचे काय? यामागील सरकारचे उद्दिष्ट पूर्ण होण्याइतपत तरी वाटचाल सुरू आहे का? याच विषयावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न गेल्या आठवड्यात जागतिक इव्ही दिवशी प्रसिद्ध झालेल्या एका अहवालाने करून दिला आहे. गेल्या आठवड्यात जागतिक इव्ही दिवस साजरा करण्यात आला. मुंबईतील रिक्षा व टॅक्सीचालकांचा इलेक्ट्रिक वाहनांना असलेला पाठिंबा व ईव्हीचा पर्याय स्वीकारण्यासाठी कोणत्या गोष्टींना प्राधान्य द्यावे लागेल याचा या अहवालात उल्लेख होता. मुंबईतील वाहतूक व्यवस्थेत शेवटच्या टप्प्यात सुविधा पुरवणारी वाहने विजेवर आधारित करण्यासाठीच्या 'व्हील्स ऑफ चेंज' मुंबईतील रिक्षा आणि टॅक्सी चालकांमध्ये इव्हीच्या स्वीकार्यतेबाबत प्रत्येक बाबतची भूमिका या अहवालातून समजून घेण्यात आली. मुंबईतील ८५ % ऑटो रिक्षा आणि टॅक्सीचालकांना इलेक्ट्रिक वाहनाबद्दल माहिती असली तरी चार्जिंग सुविधा, वित्तीय सहाय्य आणि अपुऱ्या पायाभूत सुविधांमुळे अनेकांनी इलेक्ट्रिक वाहनांचा अजूनही पर्याय स्वीकारलेला नाही. परिणामी मुंबईत शाश्वत सार्वजनिक वाहतूक प्रणाली निर्माण करण्याची प्रक्रिया मंदावत असल्याचे या अभ्यासातून समोर आले आहे. हा अहवाल 'वातावरण फाऊंडेशन' आणि 'क्लायमेट रिसर्च कन्सल्टन्सी' यांच्या संयुक्त विद्यमाने 'असर सोशल इम्पॅक्ट आणि सस्टेनेबल मोबिलिटी नेटवर्क' यांच्या सहकार्याने तयार करण्यात आला होता. या अभ्यासाअंतर्गत शहरातील वाहतूक व्यवस्थेत शेवटच्या टप्प्यात सुविधा पुरवणाऱ्या वाहनांमध्ये तातडीने ईव्हीच्या वापराची गरज अधोरेखित करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेच्या सर्व २४ प्रभागांमध्ये एकूण १ हजार २०० ऑटो रिक्षा आणि टॅक्सी चालकांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात आल्या. डिजिटल डेटा संकलनासाठी आणि भौगोलिक विश्लेषणासाठी ओजीआयएसचा वापर करण्यात आल्या अभ्यासातून ५५ % ऑटो रिक्षाचालक आणि ४५ % टॅक्सी चालकांच्या मुलाखतींद्वारे वेगवेगळे पैलू जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. मुंबईतील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत पहिल्या आणि शेवटच्या टप्प्यात कार्यरत असलेल्या रिक्षा व टॅक्सी चालकांच्या प्रश्नांच्या महत्त्वपूर्ण नोंदी आणि शिफारसी या अभ्यासातून समोर आल्या आहेत. वित्तीय सहाय्य आणि चार्जिंग विषयक त्यांची चिंता योग्य असून त्यावर उपाययोजना करण्यासाठी विशेष लक्ष द्यावे लागेल. संपूर्ण महाराष्ट्रात चार्जिंग नेटवर्क स्थापन करण्याचे काम वेगाने सुरू असून सर्व पार्टनर्स आणि भागधारकांसोबत वित्त पुरवठ्याबाबतच्या नवीन शिफारशींचा पर्यायाने तत्परतेने विचार करावा लागेल. प्रदूषण विरहित वाहतूक व्यवस्थेकडे जाण्याचे ध्येय मोठे असले तरी ते सर्वसमावेशक असले पाहिजे आणि आपण सर्वजण एकत्रितपणे मुंबई शहरासाठी निरोगी आणि अधिक सक्षम भविष्याची निर्मिती करण्यासाठी वचनबद्ध राहण्याची गरज आहे. या अहवालात असे आढळून आले आहे, की मुंबईतील ऑटो रिक्षा आणि टॅक्सी विजेवर आधारित करण्यासाठी सुरुवातीला वारेमाप खर्च आणि चार्जिंगच्या पायाभूत सुविधांचा अभाव हे प्रमुख अडथळे आहेत. एकूण ६४ % ऑटो रिक्षा आणि टॅक्सी चालकांनी अनुदानासाठीच्या पर्यायांचा शोध घेतला आहे आणि ५३ % लोकांना वित्तपुरवठा करणारी सुधारित व्यवस्था सुलभ संक्रमणासाठी फायदेशीर असल्याचे निरीक्षण नोंदवले आहे. चार्जिंग आणि बॅटरी अदलाबदल करण्यासाठीचे जाळे, वित्तीय सहाय्य आणि कृतिशील आराखडा या बदलासाठी आवश्यक गोष्टी आहे. केवळ स्वच्छ हवेसाठीच नव्हे तर हजारो कुटुंबाच्या उपजीविकेसाठी सुद्धा हे बदल अत्यावश्यक आहेत. या अहवालातून असे निदर्शनास आले की ६२ टक्के चालकांनी चार्जिंग सुविधा अपुरे असल्याचे नमूद केले तर ६० % चालकांना विजेवरील नवीन वाहनांच्या किमती भरमसाठ असल्याचे वाटते. २८ % चालकांनी वाहने किती किलोमीटर धावतील याबाबत चिंता व्यक्त केली, तर २४ % चालकांना देखभाल दुरुस्ती खर्चाबद्दलही चिंता होती. यातील काही चालकांना ईव्हीचे थेट फायदे दिसत असले तरी आर्थिक पायाभूत सुविधा आणि धोरणातील तफावतीमुळे अनेकजण हा पर्याय अजूनही स्वीकारण्याबाबत साशंक आहे. ३९ % चालकांच्या मते ईव्ही चालवणे सोपे आणि कमी खर्चिक आहे. ३९ टक्के चालकांना त्याच्या उत्पन्नात वाढ होईल असेही वाटते, तर ४५% चालक इव्हीचा वापर व देखभाल प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी होण्यासही आता तयार आहेत या खरच सकारात्मक बाबी असल्याचेही या अहवालात नमूद केले आहे. या अहवालात ईव्हीचा वापर वाढण्यासाठी काही प्रमुख शिफारसी करण्यात आल्या आहे. सर्वाधिक मागणी असलेल्या भागांमध्ये जलद चार्जिंग आणि बॅटरी अदलाबदलीचे जाळे तयार करणे तसेच वित्तीय पुरवठ्यासाठी कमी व्याजदराने कर्ज आणि अनुदान मिळवण्याचे सोपे मार्ग अशा नावीन्यपूर्ण उपयोजना करणे आवश्यक आहे. झोपडपट्ट्यांसह राखीव पार्किंग आणि चार्जिंग सुविधाही निर्माण केली पाहिजे, तसेच दीर्घकालीन आणि सुस्पष्ट धोरण तयार करून चालक व गुंतवणूकदारांना आश्वस्त करणे ही आवश्यक आहे. जुनी वाहने टप्प्याटप्प्याने मोडीत काढण्यासाठी स्क्रॅपिंग व रिसायकलिंगसाठी प्रोत्साहन देणेही काळाची गरज आहे. मुंबईची हवा शुद्ध ठेवण्यासाठी आणि उत्सर्जन कमी करण्यासाठी ऑटोरिक्षा आणि टॅक्सीचे विजेवर चालणाऱ्या वाहनांमध्ये संक्रमण घडवून आपण एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलू शकतो अशी धोरणे अचूकपणे आखण्यासाठी, योग्य ठिकाणी गुंतवणूक करण्यासाठी आणि मुंबईला प्रदूषण विरहित भविष्यातील अधिक सर्वसमावेशक सार्वजनिक वाहतुकीच्या दिशेने वाटचाल करण्यास त्यांना चालना दिली गेली पाहिजे. इव्हीबाबतच्या चर्चांमध्ये चालकांची मते अनेकदा दुर्लक्षित राहतात ही पोकळी भरून काढण्यास मदत करेल. आपण हे देखील लक्षात घेतले पाहिजे की इव्हीचा स्वीकार म्हणजे केवळ तंत्रज्ञान किंवा पायाभूत सुविधा एवढ्यापुरते मर्यादित नसून हा बदल लोक त्याची उपजीविका आणि शहराच्या सक्षमतेबद्दलही आहे हे वास्तव लक्षात घेऊन वित्तपुरवठा, नियोजन आणि धोरणांची आखणी करणे हे मुंबईच्या प्रदूषण विरहित गतिशील भविष्यासाठी महत्त्वपूर्ण ठरू शकेल.

# ब्राह्मण समाजातील गरजूंना लाभ देण्या साठी पदाचा वापर करणार-कॅप्टन आशिष दामले

## ब्राह्मण समाजाच्या इतर मागण्यांसाठी पाठपुरावा करणार–धनंजय कुलकर्णी

**मुंबई । प्रतिनिधी**

समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समितीच्या वतीने बदलापूर येथे राज्य समन्वयकांची बैठक घेण्यात आली.या बैठकीमध्ये ब्राह्मण समाजासाठी आता पर्यंत संघर्ष समितीच्या माध्यमातून अमृत परशुराम आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे तसेच

एथड आरक्षण वेद भूषण ला दहावी व वेद विभूषण बारावीचा दर्जा देण्यात आला असून वर्ग दोनच्या जमिनी वर्ग एक करून घेण्यात याव्यात यासाठी अशा काही मागण्या मान्य झाल्या असल्या तरी अजूनही ब्राह्मण समाजावर उठ सूट कोणीही टीका करतो यासाठी ब्राह्मण संरक्षण कायदा बनवण्यात यावा तसेच केजी टू पी जी शिक्षण मोफत करण्यात यावे प्रत्येक जिल्ह्यात ब्राह्मण समाजातील मुला–मुलीं साठीवस्तीगृह करण्यात यावे पुरोहितांना मासिक पाच हजार रुपये मानधन देण्यात यावे यासाठी पुन्हा संघर्ष समिती पाठपुरावा करेल असे संघर्ष समितीच्या बैठकीत ठरवण्यात आले परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष कॅप्टन आशिष दामले हे देखील या बैठकीत उपस्थित होते त्यांनी आर्थिक विकास महामंडळातून ब्राह्मण समाजासाठी गरजूना प्रामाणिकपणे मदत करू अशी आश्वासन देण्यात आले यावेळी संघर्ष समितीचे संस्थापक धनंजय कुलकर्णी,श्रीकांत जोशी,ईश्वर दीक्षित, अर्चना सरूडकर, अशोक वाघ आदी उपस्थित होते



रविवार दिनांक १४ सप्टेंबर रोजी क्लब हाऊस प्रसादम बदलापूर येथे समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समितीची बैठकघेण्यात आली यामध्ये ब्राह्मण समाजाच्या मागण्या साठी मागील अनेक वर्षापासून केलेल्या संघर्षाला पण म्हणून परशुराम आर्थिक विकास महामंडळ तसेच अमृत शिक्षण प्रशिक्षण संस्था ही देण्यात आली असली तरी अजूनही ब्राह्मण समाजाच्या अनेक समस्या तशाच आहेत यासाठी पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे संस्थापक धनंजय कुलकर्णी यांनी सांगितले तसेच वेळ पडल्यास पुन्हा आंदोलन करून असे दीपक रणनवरे यांनी सांगितले यावेळी कॅप्टन आशिष दामले परशुराम आर्थिक विकास महा मंडळाचे अध्यक्ष यांचा सत्कार संघर्ष समिती च्या वतीने करण्यात आला तसेच परशुराम आर्थिक विकास मंडळा कडून ब्राह्मण समाजा तील गरजूंना लवकरात लवकर करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली.यावेळी बोलताना कॅप्टन अशीष दामले यांनी सांगितले की, परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे प्रक्रिया जवळपास पूर्ण झालेली आहे त्या दोन महिन्यात महामंडळाचे लाभार्थी तयार होते यामध्ये व्यवसायासाठी १५ लाखापर्यंत व्याज परताव्याची योजना असेल देशांतर्गत शिक्षणासाठी दहा लाखापर्यंत कर्ज व्याज परतावा योजना आहे. परदेशात शिक्षणासाठी २० लाख रुपयापर्यंत व्याज परतावा योजना आहे,गट कर्ज ५० लाख रुपयापर्यंत असेल तसेच इतरही योजना आहेत ब्राह्मण समाजा तील गरजूंना आर्थिक विकास महामंडळा कडून कर्ज मंजूर झाल्यानंतर बँकांनी कर्ज द्यावे यासाठी उच्चस्तरीय अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आलेली असून नवउद्योजकांना नक्कीच कर्ज मिळेल असेही त्यांनी सांगितले पुरोहीतांना मानधनाचा विषय यासाठी काय करता येईल हे नक्कीच विश्वास पूर्ण माहिती घेऊन पुढे कार्य केले जाईल इतरही जे मुद्दे आहेत ते ब्राह्मण समाजातील समस्या सोडवण्यासाठी असल्यामुळे आपण आपल्या परीने प्रामाणिकपणे व निस्वार्थपणे पार पाडण्याचा प्रयत्न करू असे आश्वासन कॅप्टन आशिष दामले यांनी दिला.यावेळी मकरंद कुलकर्णी परभणी, पाटील साहेब पूर्णा, अनिल दीक्षित धुळे, उदय जोशी नंदुरबार, महेश अकोलकर,राहुल कुलकर्णी,विवेक बाभुळगावकर अंबाजोगाई धाराशिव येथील शिवराज आचार्य व त्यांचे सहकारी जालना येथील मधुसूदन दंडारे,संजय देशपांडे,महेश भालेराव, प्रज्ञा भिडे दादर, अविनाश समुद्रे ठाणे यांच्यासह अनेक राज्यस्तरीय सदस्य समन्वयक उपस्थित होते.दि.१२ ऑक्टोबर रोजी परशुराम लोटे येथे भगवान परशुराम यांचे चरणी नतमस्तक होऊन समस्त ब्राह्मण समाजाच्या इतर मागण्यांसाठी निश्चित पणे सरकार समोर मागण्या ठेवून मान्य करून घेण्यासाठी प्रयत्न केले जातील पाठपुरावा केला जाईल तसेच वेळ पडल्यास आंदोलनही केले जाईल असा ठराव या बैठकीत घेण्यात आला.

## सीओईपी विद्यापीठात नवीन इमारतींचे उद्घाटन

# उच्च व तंत्रशिक्षण संस्थांना स्वायत्तता देण्याचा शासनाचा निर्णय-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**पुणे (वृत्तसंस्था)**–देशातील उच्च व तंत्रशिक्षण देणाऱ्या संस्थांना नव संशोधन आणि सक्षम मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी स्वायतत्ता देणे ही काळाची गरज असून त्यादृष्टीने केंद्र व राज्य पातळीवर शासनातर्फे प्रयत्न सुरू असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठात ग्रंथालय व संगणक अभियांत्रिकीच्या नूतन इमारतीचे उद्धाटन व अभियांत्रिकी दिनानिमित्त आयोजित 'सीओईपी अभिमान पुरस्कार' सोहळ्याप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू सुनील भरुड, कुलसचिव डॉ. दयाराम सोनवणे, माजी संचालक शैलेश सहस्त्रबुद्धे, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष भरत गीते, सचिव सुजीत परदेशी आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, स्वायतत्ता मिळाल्यामुळे सीओईपीसारख्या संस्था जागतिक स्तरावर भागीदारी करू शकतील, तंत्रज्ञान देवाण–घेवाण व सहयोगी संशोधन करू शकतील. यामुळे महाराष्ट्राची ३ ट्रिलियन आणि भारताची ५ ट्रिलियन अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करताना सक्षम मानव संसाधनाचा सेतू उभा राहील. आगामी काळात अधिकाधिक संस्थांना स्वायतत्ता देण्याचा राज्य शासनाचा धोरणात्मक निर्णय आहे. सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या विस्तारासाठी चिखली येथे २८ एकर जागा दिली आहे. अशा संस्थांना अधिक सक्षम करण्यासाठी शासन स्तरावरून मदत केली जाईल. तसेच, संशोधन उभारण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल. भारतातील प्रतिष्ठित आणि ज्येष्ठ संस्था म्हणून सीओईपीकडे बघितले जाते. या संस्थेला १७२ वर्षांचा इतिहास असून २०२८ मध्ये संस्थेला १७५ वर्षे पूर्ण होणार आहेत. हा भारताच्या शैक्षणिक इतिहासातील विलक्षण प्रवास आहे.मुख्यमंत्री पुढे म्हणाले, १९९० च्या



संगणकीकरणाच्या काळात अनेक शंका–कुशंका निर्माण झाल्या होत्या. मात्र, हळूहळू मानव संसाधनाची निर्मिती होत गेली, भारतीय तरुणांनी सिलीकॉन व्हॅली व्यापली. माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आपली क्षमता दाखवून दिल्यामुळे भारताकडे जागतिक पातळीवर बघण्याचा दृष्टीकोन बदलला. त्याचे सर्व श्रेय अभियंत्यांनाच जाते. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि कम्प्युटिंगमुळे आज जगात वेगाने बदल होत आहेत. या बदलांसोबतच नवनवीन संधी निर्माण होत असून हॅकेथॉनसारख्या उपक्रमांतून त्याची झलक दिसते. तांत्रिक संस्था व अभियांत्रिकी महाविद्यालयांनी बदलत्या तंत्रज्ञानानुसार मानव संसाधन तयार करण्यासाठी पुढाकार घ्यावा. नवीन शैक्षणिक धोरण पारंपरिक विषयांना आधुनिकतेसह नव्या संधी उपलब्ध करून देत असल्याने तरुणाई हा बदल स्वीकारेल अशी आशाही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील नवीन शैक्षणिक धोरणात भारतीय ज्ञानपरंपरेचा समावेश झाला आहे. यामध्ये संशोधन, पेटंट व रॉयल्टी यावर भर देण्यात आला आहे. २०४७ मध्ये विकसित भारतामध्ये या बाबींचे योगदान महत्त्वाचे राहील. सीओईपीसारख्या संस्थांचे बळकटीकरण करण्यास शासन सहकार्य करेल.

# आचार्य देवव्रत यांनी घेतली महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाची शपथ

**मुंबई (वृत्तसंस्था)**–महाराष्ट्राचे नवे राज्यपाल म्हणून आचार्य देवव्रत यांनी आज पदाची शपथ घेतली. राजभवनात पार पडलेल्या या शपथविधी सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्रीमंडळातील काही मान्यवर तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती यांनी आचार्य देवव्रत यांना पदाची शपथ दिली.

आचार्य देवव्रत यांचा प्रशासकीय आणि सामाजिक क्षेत्रातील दीर्घ अनुभव लक्षात घेता त्यांच्याकडून राज्यपालपदाची जबाबदारी समर्थपणे पार पडेल, असा विश्वास यावेळी मान्यवरांनी व्यक्त केला. शपथविधीनंतर देवव्रत यांनी राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी सहकार्य करण्याचे म्हटले आहे. यानंतर राज्यपाल भवनात अधिकृत सत्काराचा कार्यक्रमही पार पडला.

महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाचा अतिरिक्त कार्यभार स्वीकारण्यासाठी गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांचे रविवारीच मुंबई येथे सपत्नीक आगमन झाले. अहमदाबाद येथून तेजस एक्स्प्रेसने आलेल्या राज्यपालांचे तसेच त्यांच्या पत्नी दर्शना देवी यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पश्चिम रेल्वेच्या मुंबई सेंट्रल स्थानकावर पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी राज्यपालांना मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानकावर रेल्वे पोलिसांतर्फे मानवंदना देण्यात आली तर राजभवन येथे पोहोचल्यावर मुंबई पोलिसांतर्फे मानवंदना देण्यात आली.उपराष्ट्रपती म्हणून निवड झाल्यानंतर सीपी राधाकृष्णन यांनी महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी



गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्याकडे महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचा अतिरिक्त कार्यभार

सोपवला. आयएएनएसच्या वृत्तानुसार, राष्ट्रपतींचे प्रेस सचिव अजय कुमार सिंह यांनी ११ सप्टेंबर रोजी एक अधिकृत आदेश जारी केला. यात म्हटले आहे की, महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या सध्याच्या कर्तव्यांव्यतिरिक्त त्यांची कामे पार पाडण्यासाठी ही नियुक्ती करण्यात आली आहे.आचार्य देवव्रत जुलै २०१९ पासून गुजरातच्या राज्यपालपदाचा कार्यभार सांभाळत आहेत. यापूर्वी त्यांनी ऑगस्ट २०१५ ते जुलै २०१९ पर्यंत हिमाचल प्रदेशचे राज्यपाल म्हणून काम पाहिले आहे. त्यांच्या अनुभवामुळे आणि प्रशासकीय कौशल्यामुळे त्यांना महाराष्ट्राची जबाबदारीही सोपवण्यात आली आहे. आता ते दोन्ही राज्यांच्या कारभारावर लक्ष केंद्रित करतील आणि राज्यपाल म्हणून त्यांच्या जबाबदाऱ्या पार पाडतील.

# अखेर दिवा रेल्वे स्थानकातील शौचालय प्रवाशांसाठी खुले

**संतोष पडवळ । ठाणे**

संसदरत्न कार्यसम्राट खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नाने आणि दिवा रेल्वे प्रवासी संघटना व रेल्वे प्रवाशांच्या मागणीने दिवा स्थानकातील फलाट क्रमांक एकवर रेल्वे प्रवाशांसाठी सुसज्ज शौचालय बांधण्यात येत होतं, सदर शौचालयाचे काम हे पूर्ण झाल्यानंतर आज शिवसेना शहरप्रमुख रमाकांत मढवी यांच्या सूचनेनुसार शिवसेना उपशहर प्रमुख शैलेश पाटील, उपशहर प्रमुख व दिवा रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष अँड आदेश भगत, नगरसेवक अमर पाटील, स्थानिक नागरिक अरविंद भोईर, सतीश म्हात्रे, शाखाप्रमुख नितीन ओतुरकर, आशिष शिंदे, सौ.कविता भोसले, सौ. अंजना सुतार, सौ. लीना चौगुले व इतर पदाधिकाऱ्यांच्या उपस्थित हे शौचालय आज प्रवाशांसाठी खुले



करण्यात आले. दिवा रेल्वे स्थानकात नऊ फलाट असून एकही फलाटावर शौचालयाची व्यवस्था नव्हती, त्यामुळे प्रवाशांना विशेषता महिला प्रवाशांना त्याचा विशेष त्रास होत होता. दिवा रेल्वे स्थानकात आज कोकण, पनवेल, वसई, मुंबई, कर्जत, कसारा या दिशेने लोकल सुटत असतात, त्यामुळे दिवा रेल्वे स्थानकात प्रवाशांची प्रचंड रेलचेल बघायला मिळते. मध्य रेल्वे मार्गावर सर्वात गर्दीचे स्थानक म्हणून देखील दिवा स्थानकाचा उल्लेख केला जातो. येथील प्रवाशांना शौचालयाची सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून दिवा रेल्वे प्रवासी संघटना सातत्याने प्रयत्नशील होती. कार्यसम्राट खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून दिवा स्थानकाचा कायापालट करण्यात आला आहे. सरकते जिने, नवीन तिकीट घर, आसन व्यवस्था, उपहारगृह, पिण्याच्या पाण्याची सोय, अशा विविध सुविधा खासदारांच्या माध्यमातून या स्थानकात देण्यात आल्या आहेत. प्रवाशांसाठी हे शौचालय खुले झाल्याने प्रवाशांनी यावेळी आनंद व्यक्त केला व खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे, शिवसेना दिवा शहर व रेल्वे प्रवासी संघटनेचे आभार व्यक्त केले.

# बंजारा समाजाला आदिवासी तुन आरक्षण देऊ नये

## धडगावात भव्य मोर्चा काढत आदिवासी समाजाकडून तीव्र विरोध; एक दिवसीय धरणे आंदोलन

**मोलगी । रविंद्र वळवी**

बंजारा, वंजारी, लमाण, व लंबाडी ह्या हिंदू जातींचा अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश करु नये म्हणून आदिवासी समाजाकडून धडगाव येथे भव्य मोर्चा काढण्यात आला. पंचायत समिती पासून ते तहसील कचेरी पर्यंत भव्य मोर्चा काढण्यात आला. यावेळी तहसील समोर एक दिवसीय धरणे आंदोलन देखील करण्यात येऊन तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात म्हटले की, मराठा समाजाने हैदराबाद गॅझेट गॅझेटियर चा आधार घेऊन मराठा ही कुणबी जातीचा भाग असल्याचे सांगत आंदोलन करुन मराठा कुणबी एकच म्हणत आंदोलन करुन आरक्षण प्राप्त केले. त्याच धर्तीवर बंजारा हा देखील तेलंगणा राज्यात अनुसुचित जमातीत असून महाराष्ट्रात देखील बंजारा, वंजारी, लमाण, इ. जातींचा अनुसुचित जमातीत समावेश करावा म्हणून राजकीय मागणी रेटण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे, त्यास आदिवासी समाजाचा पूर्णपणे विरोध असून आदिवासी समाज केवळ बंजारा समाजाला नव्हे तर इतर सर्व जातींना आदिवासीत समावेश करण्याला विरोध करत आहे. तेलंगणा राज्यात बंजारा जातीला जमात म्हणून आणीबाणीच्या काळात राजकीय दबावाचा वापर करुन राज्य यादीत समावेश केल्याने तेलंगणा येथे खऱ्या आदिवासी





समाजाने त्यास पूर्णतः विरोध केला असून सदर प्रकरण हे मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. तसेच, एखाद्या राज्यात एखादी जमात अनुसुचित जमाती मध्ये समावेश केली असली तरी ती जमात दुसऱ्या राज्यात आपोआप जमात म्हणून घोषित केली जाऊ शकत नाही अशी संविधानिक चौकट कायद्याने आखून दिलेली आहे. असे असतांना राजकीय मागणी म्हणून बंजारा व अन्य जातींना आदिवासीत समावेश करु नये तथा बंजारा समाजाच्या बाबतीत हैदराबाद गॅझेट गॅझेटियर मध्ये हिंदू जाती, शेतकरी म्हणून उल्लेख आहे आणि ते आदिवासी असण्याचे निकष पूर्ण करीत नाही म्हणून अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश करता येत नाही. व कोणत्याही जातीला आदिवासीत समावेश करु नये अशी मागणी आदिवासी समाजाकडून करण्यात आली. यावेळी माजी मंत्री के. सी पाडवी, आ.आमश्या पाडवी, गणेश पराडके, सी.के.पाडवी, सिताराम पावरा, शिवाजी पराडकेसह आदींनी मनोगत व्यक्त केले.

या मोर्चात खासदार ॲड. गोवाल पाडवी, विजय पराडके, रतन पाडवी, धनसिंग पावरा, हारसिंग पावरा, प्रविण पावरा, प्रमोद वसावे, संदिप वळवी, गिताताई पाडवी, वकील संघ, सरपंच परिषद, सकल आदिवासी समाजासह आदिवासी सामाजिक संघटना व विविध सामाजिक संघटना या मोर्चा व धरणे आंदोलनात सहभागी झाल्या.

**हैदराबाद गॅझेट गॅझेटियर म्हणजे काय?**

हैद्राबाद गॅझेट हे प्रामुख्याने १९ व २० व्या शतकात हैद्राबाद राज्यात (उशपींरश्र झींोंळपलशी) मध्ये राहणाऱ्या लोकसंख्येचे हैद्राबादच्या निझाम यांनी सादर केलेले विविध अहवाल होय. ज्यात लोकसंख्या (उशपीींी) जाहीर करताना लक्षात घेण्यात येणाऱ्या गॅझेटर चे तत्कालीन नोंदींच्या आधारे आज जाती/जमातीचा इतिहास व समाज शास्त्रीय आलेख बघता येतो.

या हैद्राबाद गॅझेट/गॅझेटियर महत्वाचे तीन गॅझेट/गॅझेटियर येतात, ज्यात ब्राह्मण जातीपासून ते वन व पहाडी भागात राहणाऱ्या आदिवासी (ींळलशी) जमातीपर्यंत सर्वांचा आकृतीबंध लोकसंख्येच्या अनुषंगाने मांडणी करणे महत्वाचे ऐतिहासिक पुरावे म्हणून देखील वापरले जातात. याद्वारे तत्कालीन समाजाची विभागणी कशी आणि कश्याच्या आधारावर केली जात असे यांच्या ऐतिहासिक नोंदी तपासून आजच्या काळात त्याचा रेलेव्हन्स म्हणजेच गरज अधोरेखित होते.

# परळी येथे साप्तशृंगी दुर्गाउत्सव मंडळाची कार्यकारिणी जाहीर



**परळी । प्रतिनिधी**

प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी परळी शहराच्या धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रातील प्रसिद्ध असणार्या गणेशपार विभागातील साप्तशृंगी दुर्गाउत्सव मंडळ २०२५ ची कार्यकारनी विशाल भैया देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली व परळी नगरीचे माजी नगरअध्यक्ष तथा साप्तशृंगी दुर्गा सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दीपक नाना देशमुख यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली व माऊली चिकने,केशवराव जाधव, राजाभाऊ बारगजे, विजय पुजारी, विजय माळी, बालाजी घोडके, उत्तम मोरे, आबासाहेब देशमुख, प्रकाश चाचा देशमुख, अरुण तापके, राम लोखंडे, नितीन चव्हाण दत्ता काळे, बालाजी अनंतपुरे, पेंटर अनिल, जगन्नाथ सुरवसे, दीपक पूरभय्ये, राजू पूरभय्ये, अनंत देशमुख, पांडू सुरवसे, ओम दादा देशमुख सतीश सानप, मुकुंद देशमुख, सुनील देशमुख, अँड. अर्जुन सोळंके प्रदीप देशमुख, नीलेश देशमुख अरविंद देशमुख या सर्वांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये चिठ्ठी काढून लहान मुलांच्या हस्ते चिठ्ठी द्वारे खालील प्रमाणे कार्यकारिणी निवडण्यात आली अध्यक्ष दत्तात्रय तुरुप,उपाध्यक्ष, शुभम मुंडे, लखन ठाकूर,सचिव संग्राम पवार सहसचिव सौदागर शेळके, कोषाध्यक्ष तेजस देशमुख, सहकोषअध्यक्ष गोविंद चाटे, कार्यअध्यक्ष भैय्या मस्के, सजावट प्रमुख संदीप देशमुख, प्रसिद्धी प्रमुख तुकाराम चाटे, गणेश पुजारी वरील सर्व पदाधिकारी यांचे दीपक देशमुख यांनी अभिनंदन केले.

# अतिवृष्टीने जिल्ह्याला झोडपले नुकसानीचे तातडीने पंचनामे करा

## खा.बजरंग सोनवणे यांचे पालकमंत्री अजित पवार यांना पत्र

**बीड । प्रतिनिधी**

दि.१४ आणि १५ सप्टेंबर रोजी रात्री असे सलग दोन दिवस बीड जिल्ह्या वासियांना अतिवृष्टीने झोडपले आहे.यामुळे बीड जिल्ह्यातील सर्व नद्या दुथडी भरून वाहत आहेत.परिणामी, शेतकऱ्यांचे प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक भागात पिके पाण्यात असून काही ठिकाणी नदीपात्रा शेजारील जमीनी देखील खरडून गेल्या आहेत.शिवाय घरांची देखील पडझड झालेली असून नुकसानीचे तातडीने पंचनामे करून सरसकट नुकसान भरपाई द्यावी,अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे.पालकमंत्री अजित दादा पवार यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे,बीड जिल्ह्यात सलग पावसा मुळे अनेक ठिकाणी पूरसदृश्य परिस्थिती



निर्माण झाली आहे. सकाळी सात वाजल्या पासून स्वत: परिस्थिती वर लक्ष ठेवून आहे. बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील कडा गावातील ११,चोभा निमगावातील १४,घाटा पिंपरीतील ७, पिंपरखेडातील ६, धानोऱ्यातील ३ व डोंगरगणमधील ३ नागरिक असे मिळून ४४ लोक अडकलेले होते.याच बरोबर जिल्ह्यातील बीड तालुक्यातील नाळवंडी, नेकनूर,य ेळंबघाट,आष्टी तालुक्यातील दौला वडगाव,धानोरा,कडा, पिंपळा,टाकळसिंग, दादेगाव,अंबाजोगाई तालुक्यातील लोखंडी, पाटोदा,केज मधील केज,यूसूफ वडगाव, होळ,शिरूर तालुक्या तील शिरूर महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद आहे.आष्टी तालुक्यात तर कडा आणि परिसरात ढगफुटीसदृस्य पाऊस झालेला आहे. कधी नव्हे ते नदीला मोठा पुर आला. यामुळेजनजीवन विस्कळीत झाले होत. तर अनेक भागात मुसळधार पावसामुळे विविध नद्यांच्यापाण्याने पात्र ओलांडल्याने शेतात पाणी शिरले आहे.शिवाय जमीन खरडून गेल्या आहेत. यामुळे पिकांचे आणि शेतीचे मोठे नुकसान झाले आहे.याच बरोबर काही भागात घरांची पडझड देखील झाली आहे.आष्टी तालुक्यात पुराचे पाणी घरात घुसून संसारोपयोगी साहित्याचेही नुकसान झाले आहे.यामुळे शासनाने तातडीने स्पॉटवर जावून पंचनामे करावेत व सरसकट नुकसान भरपाई द्यावी, असे पत्रात म्हटले आहे.

# ॲड.सुभाष भाऊ राऊत यांनी घेतली गोरख देवडकर कुटुंबाची भेट घेऊन केले सांत्वन

**बीड । प्रतिनिधी**

ओबीसीचे आरक्षण गेले म्हणून आत्महत्या केलेल्या नाथापूर ता. बीड येथील कुंभार समाजाचे स्व.गोरख नारायण देवडकर यांच्या कुटुंबियांच्या सांत्वन भेटीसाठी ओबीसी महामंडळाचे माजी अध्यक्ष श्री. बापूसाहेब भुजबळ, समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ड. सुभाष राऊत,रविभाऊ सोनवणे,कुंभार समाजा चे नेते अर्जुन दळे, दिलीप भुजबळ, सोलापूर जिल्हाध्यक्ष आबासाहेब खैरे,समता परिषद शहराध्यक्ष निखिल शिंदे,नितीन राऊत यांनी भेट दिली.



यावेळी ना.छगनरावजी भुजबळ यांनी या कुटुंबाची फोन वरून विचारपूस करून धीर दिला व मुलीच्या शिक्षणाची जबाबदारी स्विकारली व एक लाख रुपये आर्थिक मदत केली.गोरख देवडकर मोल मंजूरी करून आपल्या मुलीलापोलिस भरती होण्यासाठी पैसे पुरवत होते आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची होती तरी पण कुठे तरी आपली मुलगी शिकावी लेकराला तरी शिकवावे पण सरकारने घात केला व मराठा समाजाला जीआर काढून ओबीसीत आरक्षण दिले आता माझी मुलगी कशी पोलिस होणार व ओबीसी आरक्षण गेले हया भितीने आत्महत्या केली लाखो गोरगरीब ओबीसी समाजातील तरुण तरुणी बेरोजगार आहेत.त्यांना नोकरी नाही ह्याचा सरकारने विचार करावा व मराठा समाजाला वेगळे आरक्षण द्यावे,बोगस कुणबी प्रमाणपत्र देणे तात्काळ थांबवा व जीआर रद्द करा अशी मागणी परिवाराने व अँड.सुभाष भाऊ राऊत यांनी केली आहे.

# पोलिस निरीक्षक धनंजय ढोणे यांचा उल्लेखनीय कामगिरीबद्दल सन्मान

**बीड । प्रतिनिधी**

परळी रेल्वे स्थानकात दि. ३१ ऑगस्ट रोजी पंढरपूर येथून रेल्वेने आलेल्या व रेल्वे स्थानकावर थांबलेल्या एका मजूर कुटुंबातील चिमुकलीवर घडलेल्या अत्याचार घटनेचा अवघ्या पाच तासात तपास लावुन आरोपी अटक केल्याच्या कामगिरीबद्दल संभाजीनगर पोलिस ठाण्याचे पो.नि.धनंजय ढोणे व कर्मचार्यांचा पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी प्रशस्तीपत्र देऊन गौरव केला.परळी रेल्वे स्थानकात दि. ३१ ऑगस्ट रोजी दुपारी अल्पवयीन मुलीवर अत्याचार करुन फरार झालेल्या आरोपीची ओळख,त्याला ताब्यात घेणे, गुन्हा दाखल करणे असा तपास करण्याचे संभाजीनगर पोलिस ठाण्याचे पो.नि.धनंजय ढोणे यांच्यापुढे आव्हान होते. ढोणे यांनी यासाठी



सीसीटीव्हीची मदत घेत आरोपीचे फुटेज मिळवून ओळख पटवली.त्याला ताब्यात घेण्यासाठी वेगवेगळी पथके नेमुन ताब्यात घेत गुन्हा दाखल केला व अवघ्या पाच तसातच या घटनेचा तपास लावला. संभाजीनगर पोलिसांच्या या कामगिरीचे जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी प्रशस्तीपत्र देऊन गौरव केला. यावेळी पो.नि. धनंजय ढोणे, पो.उपनिरीक्षक अनिल शिंदे, सहाय्यक.पो.नि नरहरी नागरगोजे, पो. अंमलदार भगवान चव्हाण यांची उपस्थिती होती.

# कानडीमाळी येथे अतिवृष्टी,गावा सह इतर गावाचा संपर्क तुटला

## सोयाबीन पीकाचे मोठे नुकसान

**केज । प्रतिनिधी**


केज तालुक्यातील कानडीमाळी गावासह तालुक्यात ढगफुटी झाली आहे.अति मुसळधार पाऊस झाला रात्री आणि सकाळी झालेल्या संततधार पावसामुळे नदी,नाली, ओढ्याला महापुरआला त्यामुळे केज,कानडी माळी विडा रस्ता बंद पडला.त्यामुळे सरकारी कर्मचारी,शाळकरी मुले,गावकरी दुपार पर्यंत अडकून पडले होते.सोयाबीन पीक कापणीला आलेले होते तेही ढगफुटीपावसामुळे सोयाबीन पिकाचे मोठे नुकसान झाले शेतातून पुरासारखे पाणी वाहत होते पुराचे पाणी शेतातून वाहत होते. त्यामुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत सोयाबीन हे मुख्य पीक आहे. कानडी माळी गावासह साबला,धर्माळा,लहुरी, तरनळी,येवता,विडा, कासारी,उमरी सह केज तालुक्यात मुसळधार पावसामुळे सोयाबीन पिकाचे मोठे नुकसान झाले तरी सरकारने तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.



# शंकरराव बरकसे यांचे निधन

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई येथील कोल्हेर रोडवरील आश्रमशाळे समोर वास्तव्यास असलेले शंकरराव रंगनाथराव बरकसे यांचे वयाच्या ६५ व्या वर्षी अल्पशा आजाराने रविवारी रात्री १०-३० वाजता निधन झाले . त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले,एक विवाहित मुलगी,नातवंडे असा मोठा परिवार आहे. स्व.शंकरराव बरकसे हे प्रा.राजेंद्र बरकसे यांचे बंधू व अवनीकॉम्प्युटर्स चे संचालक गणेश बरकसे यांचे ते वडिल होते. स्व.शंकरराव बरकसे यांच्या पार्थिवावर सोमवार दि.१५ रोजी दुपारी १२ वाजता चिंतामणी स्मशानभूमीत अंत्यसंस्कारकरण्यात आले.यावेळी समाजा तील प्रतिष्ठित नागरिक नातेवाईक अंत्ययात्रेत सहभागी झाले होते. सुस्वभावी स्वभावामुळे स्व.शंकरराव यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ पसरली आहे.





केज – तालुक्यातील केज ते विडा मार्गावरील रस्त्यावरील पुलावरून पाणी वाहत असल्यामुळे सकाळी शाळेला जाणारे कानडीमाळी , साबला , धर्माळा , तरनळी , कोल्हेवाडी , नागझरी , लव्हुरी , येवता अशा अनेक पुढील जाणारे कर्मचारी वर्ग पुलावर थांबलेले दिसत आहेत .



# आष्टी,पाटोदा,शिरूर तालुक्यांमध्ये अतिवृष्टीचा प्रचंड कहर

## तुफान पाऊस व महापूरामुळे शेतकरी व नागरिकांचे मोठे नुकसान

### आ.सुरेश धस यांनी हेलिकॉप्टरद्वारे जलप्रलयात अडकलेल्या नागरिकांची सुटका करत दिलासा



**आष्टी | रवींद्रनाथ ठाकूर**

मागील २४ तासांत आष्टी,पाटोदा व शिरूर या तालुक्यांमध्ये झालेल्या अतिवृष्टी व ढगफुटीमुळे नैसर्गिक आपत्तीचे गंभीर स्वरूप उभे राहिले आहे.कांबळी /कडी नदी,घाटा पिंपरी,दादेगाव,डोंगरगण,सुलेमान देवळा,कडा,शेरी खुर्द,निमगाव चोभा,पिंपरखेड,टाकळी अमिया या भागात महापूर व प्रचंड पाण्याची वाढलेली पातळी नागरिकांच्या जीविताला धोका ठरली आहे. यामुळे अनेक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून त्यांचे शेतकरी बांध,पिके व शेतीचे सुसंगत नुकसान झाले आहे. या गंभीर परिस्थितीत जनतेसाठी तत्पर आमदार सुरेश धस यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन व संबंधित प्रशासनाशी समन्वय साधून एनडीआरएफ व इंडियन आर्मी नाशिकच्या माध्यमातून हेलिकॉप्टरद्वारे जलप्रलयात अडकलेल्या नागरिकांची सुटका केली. अडकलेल्या नागरिकांची संपूर्ण यादी मौजे टाकळी अमिया:शिवाजी दगडू महानवर,शकुंतला शिवाजी महानवर, साईनाथ नवनाथ महानवर,पारूबाई दगडू महानवर,शुभांगी नवनाथ महानवर,मौजे कडा:गोविंद सापते योगेश सापते,असराबाई सापते,मीनाबाई सापते,सुषमा सापते,आर्या सापते,काजल सापते,कृष्णा ससे,अमोल बेदरे,आकाश बेदरे,सुमन बेदरे,मौजे शेरी खुर्द:महेश ढोबळे पाटील,विजय ढोबळे,प्रिती महेश ढोबळे सुरवणा विजय ढोबळे,राजदीप विजय ढोबळे,गायबाई रामदास ढोबळे,युवा नेते जयदत्त धस यांनी सकाळपासून घाटा पिंपरी,केळ,गहुखेल हरेवाडी,शेडाळा,वेलतुरी,गंगादेवी, सावरगाव मायंबा,डोंगरगण, दौलवडगाव,धामणगाव इत्यादी गावांचा दौरा करून झालेल्या नुकसानीची पाहणी केली. आमदार सुरेश धस यांनी सकाळी सात वाजल्यापासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री अजित पवार,जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, अहिल्यानगर जिल्हाधिकारी पंकज आशिया,भारतीय लष्कर व एनडीआरएफ नाशिक यांच्याशी सतत संपर्क साधून जलद बचाव कार्यवाही राबवली. सर्व नागरिकांना इंडियन आर्मी व एनडीआरएफच्या माध्यमातून रुग्णालयात तपासणीसाठी सुरक्षित स्थळी पोहोचवण्यात आले. महाराष्ट्रात ढगभर लोकप्रतिनिधी असूनही संकटात तत्परतेने जनतेच्या मदतीस धावून जाणारे मोजकेच नेते आहेत,त्यात आमदार सुरेश धस यांचा विशेष उल्लेख करावा लागेल. पावसाची तीव्रता कमी झाल्यानंतरही नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरघोस पंचनामे व अर्थसहाय्य मिळवण्यासाठी सतत पाठपुरावा करत राहणार असल्याचा जनतेचा विश्वास दृढ झाला आहे. डिझास्टर मॅनेजर सुरेश धस संकटाच्या काळात जनतेच्या उज्ज्वल भविष्याचे रक्षण करणारा नवा आदर्श!

## नांदेड येथे बंगाली सुवर्णकार एकता असोशियनच्या वतीने विश्वकर्मा महोत्सवाचे आयोजन

**नांदेड | हनुमंत चंदनकर**

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी बंगाली स्वर्णकार एकता असोशियन सराफा मार्केट नांदेड च्या वतीने दिनांक १७/०९/२०२५ ते दिनांक १९/०९/२०२५ पर्यंत विश्वकर्मा महोत्सवाचे आयोजन जागृत महादेव मंदिर किला रोड सराफा बाजार नांदेड येथे करण्यात आले आहे विश्वकर्मा महोत्सवाची सुरुवात दिनांक १७ सप्टेंबर रोजी पूजा अभिषेक आरती करून स्थापन होणार आहे १८ सप्टेंबर रोजी पूजा आरती तर १९ सप्टेंबर रोजी विश्वकर्मा पूजा आरती व भव्य महाप्रसादाचा आयोजन करण्यात आला आहे महाप्रसादानंतर विश्वकर्मा मूर्ती मिरवणूक काढली जाणार आहे व नवघाट नांदेड येथे मूर्ती विसर्जित केली जाणार आहे तरी या कार्यक्रमाचा समाज बांधवांनी लाभ घ्यावे असे आवाहन बंगाली स्वर्णकार एकता असोशियन व बंगाली स्वर्णकार यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## कर्जाच्या आमिषाने व्यापाऱ्यांची लूट नवापूरात समर्थ फायनान्सचा घोटाळा

**नवापूर | रसिक गावित**

नवापूर शहरात 'समर्थ फायनान्स' या खाजगी कंपनीकडून कर्जाच्या नावाखाली व्यापाऱ्यांची मोठ्या प्रमाणावर फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. कमी व्याजदराच्या आकर्षक जाहिरातींच्या माध्यमातून व्यापाऱ्यांना जाळ्यात ओढून त्यांच्याकडून लाखो रुपयांची उकळपट्टी करण्यात आली.या प्रकरणात व्यापारी अमित सोनार यांनी




३५ लाख रुपयांच्या कर्जासाठी अर्ज केला होता. मात्र कंपनीचा संचालक किशोर दुसाने याने प्रोसेसिंग फी म्हणून त्यांच्याकडून तब्बल ७२,३०० रुपये घेतले. सहा महिने उलटूनही कर्ज न मिळाल्याने अखेर सोनार यांनी नवापूर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली आहे.यामुळे शहरातील व्यापारी वर्गात तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. आणखी काही व्यापारी लवकरच पुढे येऊन तक्रारी दाखल करण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला असून, दोषींवर कठोर कारवाई केली जाईल असे सांगितले आहे.दरम्यान, व्यापारी संघटनांनी नागरिकांना इशारा दिला आहे की कोणत्याही फायनान्स कंपनीसोबत व्यवहार करण्यापूर्वी तिची सत्यता व शासकीय परवाने तपासावेत, अन्यथा अशा फसवणुकीचे बळी पडण्याचा धोका संभवतो.

## बोरद येथे 'सेवा पंधरवडा' अंतर्गत 'पांदण रस्ते' मोहिमेसाठी ग्रामसभा

**बोरद | मंगेश पाटील**

मा. जिल्हाधिकारी, नंदुरबार आणि मा. गटविकास अधिकारी, तळोदा यांच्या निर्देशानुसार, 'सेवा पंधरवडा' अंतर्गत 'पांदण रस्ते' विषयावर मोहीम राबवण्यासाठी बोरद येथे ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती. सरपंच अनिताबाई भिलाव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत तलाठी प्रदीप वसावे, मंडळ अधिकारी मिथुन राठोड आणि ग्रामपंचायत विस्तार अधिकारी विजय पाटील उपस्थित होते.या ग्रामसभेत महसूल व वन विभागाच्या २९ ऑगस्ट २०२५ रोजीच्या शासन निर्णयाचे वाचन करण्यात आले. या शासन निर्णयानुसार, मौजे बोरद गावातील ग्रामीण रस्ते, हद्दीचे ग्रामीण रस्ते, ग्रामीण गाडीमार्ग, पायमार्ग, शेतावर जाण्याचे



पायमार्ग व गाडीमार्ग तसेच शेत पांदण रस्ते यांसाठी शिवार फेरी आयोजित करण्यात आली होती. यामध्ये ग्राम महसूल अधिकारी, ग्रामविकास अधिकारी, महसूल सेवक, पोलीस पाटील, सरपंच, उपसरपंच आणि स्थानिक नागरिक सहभागी झाले होते.या शिवार फेरी आणि गाव नकाशाच्या आधारे गाव नकाशावर नोंद असलेल्या रस्त्यांचे प्रपत्र-१ तयार करण्यात आले. तसेच, वापरात असलेल्या, पण गाव नकाशावर नसलेल्या रस्त्यांचे प्रपत्र-२ तयार करण्यात आले. 'सर्वांसाठी घरे सन २०११' पूर्वीच्या प्रयोजनार्थ केलेले अतिक्रमण नियमानुकूल करण्यावरही चर्चा झाली.

## बंजारा समाजाला अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट करू नये: सरपंचांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन

**नंदुरबार | दिपक गोसावी**

बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात समाविष्ट करू नये, अशी मागणी करत तळोदा तालुक्यातील सरपंचांनी नंदुरबार जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. जर ही मागणी मान्य झाली, तर सर्व सरपंच आपल्या पदाचा राजीनामा देऊन तीव्र आंदोलन करतील, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, अनुसूचित जमाती निश्चित करण्याचा अधिकार केवळ संसदेला आहे. कोणत्याही राज्य सरकारला किंवा संस्थेला दबाव आणून त्यात बदल करण्याचा अधिकार नाही., बंजारा समाजाची भाषा, संस्कृती, चालीरीती आणि जीवनशैली आदिवासी समाजापेक्षा पूर्णतः वेगळी आहे. त्यामुळे त्यांचा समावेश करणे योग्य नाही., बंजारा समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश



झाल्यास मूळ आदिवासी समाजाच्या शिक्षण, नोकरी, शिष्यवृत्ती आणि इतर शासकीय योजनांवरील हक्कांवर थेट परिणाम होईल. यामुळे ऐतिहासिकदृष्ट्या मागासलेल्या आदिवासींवर अन्याय होईल, अशी भीती निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे.

हे निवेदन पंचायत राज विकास मंच आणि अखिल भारतीय सरपंच परिषदेच्या वतीने देण्यात आले असून, त्यावर तळवे ता. तळोदा येथील सरपंच मोग्या भिल (अध्यक्ष, तालुका सरपंच परिषद) आणि दलेलपुर ता. तळोदा येथील सरपंच राजू प्रधान यांच्यासह ऐकून २३ सरपंचांच्या सह्या आहेत. त्यांनी शासनाला अशी असंविधानिक मागणी मान्य न करण्याची विनंती केली आहे.

## बंजारा समाजाला आदिवासीत समाविष्ट करू नये, जन सुरक्षा कायदा रद्द करा; १९ सप्टेंबर रोजी आमलाड फाट्यावर रास्ता रोको आंदोलन

**बोरद | मंगेश पाटील**

बंजारा समाजाला आदिवासी प्रवर्गात समाविष्ट करू नये आणि जन सुरक्षा कायदा रद्द करण्यात यावा, या प्रमुख मागण्यांसाठी तळोदा तालुक्यातील आमलाड फाट्याजवळ १९ सप्टेंबर रोजी रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. आदिवासी अधिकार मंच आणि माकप तळोदा तालुका कमिटीतर्फे हे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.

आंदोलनाबाबतचे निवेदन तळोदा येथील तहसीलदार आणि सहाय्यक पोलीस निरीक्षकांना देण्यात आले आहे. निवेदनात म्हटले आहे की, १९ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता आमलाड फाट्याजवळ आंदोलन सुरू होईल. आंदोलनाच्या ठिकाणी येऊन निवेदन स्वीकारण्याची विनंतीही निवेदनात करण्यात आली आहे.

या निवेदनावर आदिवासी अधिकार मंचचे जिल्हाध्यक्ष दयानंद चव्हाण आणि माकपचे तळोदा तालुका अध्यक्ष अनिल ठाकरे यांच्यासह तालुका कमिटीच्या सर्व सदस्यांच्या सह्या आहेत. आंदोलनाच्या या भूमिकेमुळे प्रशासनाचे लक्ष वेधले गेले आहे.




हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077